# (सशस्त्र पोलीस शिपाई भरती 2022-2023)

## राज्य राखीव पोलीस बल गट क्र.18 (भा.रा.ब.-5) काटोल जि.नागपुर

## (कॅम्प अमरावती)

# लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांना सुचना

---

1) राज्य राखीव पोलीस बल गट क्र.18 (भा.रा.ब.-5) काटोल जि.नागपुर कॅम्प अमरावती या आस्थापनेवर सन 2022-2023 मध्ये रिक्त असलेल्या 86 पदाकरीता पोलीस भरती 2022-2023 आयोजीत करण्यात आली आहे. सदर पोलीस भरती बाबत शारीरिक व मैदानी चाचणी दिनांक 18/07/2024 ते दिनांक 19/07/2024 पर्यंत घेण्यात आलेली आहे. तसेच उमेदवारांना मैदानी चाचणीमध्ये मिळालेल्या गुणाची यादि www.mahapolice.gov.in आणि www.maharashtrasrpf.gov.in या संकेत स्थळावर तसेच या आस्थापनेवरील मुख्य प्रवेशद्वार येथील नोटीस बोर्डवर जाहिर करण्यात आलेली आहे.
2) **सशस्त्र पोलीस शिपाई भरती 2022-23 लेखी परिक्षा दिनांक 04/08/2024 रोजी दुपारी 12:00 वाजता घेण्यात येणार असुन त्या बाबतचे प्रवेश पत्र महा-आयटी कंपनी मुंबई यांचे कडुन वाटप करण्यात येणार आहे**. त्या प्रमाणे उमेदवारांना परिक्षाकेंद्रवर सकाळी 07.00 वाजता हजर राहणे अनिवार्य आहे. **सकाळी 07.00 वाजता नंतर परिक्षा केंद्रवर येणाऱ्या उमेदवारांना कुठल्याहि परिस्थितीमध्ये परिक्षा केंद्राच्या आत प्रवेश देण्यात येणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**
3) लेखी परिक्षेकरीता येणाऱ्या उमेदवारांनी महा-आयटी यांनी दिलेले परिक्षेबाबतचे प्रवेश पत्र तसेच मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेश पत्र उमेदवारांकडे असतील तरच परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल.
4) उमेदवारांचे स्वत:चे वैध फोटो आयडी (उदा. पॅनकार्ड, आधारकार्ड, मदतान कार्ड, वाहन चालक परवाना ईत्यादी) सोबत असणे अनिवार्य आहे.
5) उमेदवार यांनी कोणत्याही प्रकारचे पेन, मोबाईल फोन, डिजीटल वॉच, डायरी, मायक्रो फोन, ईअर फोन किंवा कोणत्याही प्रकारचे ईलेक्ट्रॉनीक डिव्हाईस तसेच नोटस व पुस्तके परिक्षा केंद्राच्या आत सोबत घेवुन येता येणार नाही याची नोंद घ्यावी.
6) उमेदवारांनी परिक्षा केंद्रमध्ये एकदा प्रवेश केल्यानंतर परिक्षा संपेपर्यंत कुठल्याही परिस्थितीमध्ये परिक्षा केंद्रच्या बाहेर जाता येणार नाही याची नोंद घ्यावी.
7) परिक्षा केंद्राच्या आवारात मित्र, नातेवाईक , पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तीस प्रवेश देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.
8) लेखी परिक्षेकरीता येतांना उमेदवारांनी स्वत:चे चार पासपोर्ट साईज छायाचित्र सोबत आणावे.
9) परिक्षा केंद्रवर अथवा परिक्षा केंद्रच्या परीसरात कुठल्याही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता परीक्षा केंद्रावर खोलीनिहाय व्हीडीओ रेकॉर्डींग तसेच C.C.T.V. रेकॉर्डींग करण्यात येणार आहे तसेच ओळख पटण्याकरीता प्रत्येक उमेदवारांची बायोमॅट्रीक्स घेण्यात येणार असुन डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परीक्षे दरम्यान गैरवर्तन आढळुन आल्यास उमेदवारास लेखी परीक्षे करीता अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती आवश्यक कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.
10) **लेखी परिक्षेदरम्यान उमेदवार आपसात बालतांना आढळल्यास सदरचा प्रकार नकल करीत असल्याचे समजुन दोन्ही उमेदवारांना त्याक्षणीच पुढील पुर्ण प्रक्रीयेकरीता अपात्र ठरविण्यात येईल. याची सर्व उमेदवार यांनी नोंद घ्यावी.**

(एम.राकेश कलासागर)
समादेशक तथा भरती प्रमुख
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.18 (भा.रा.ब.-5) काटोल
जि.नागपुर कॅम्प अमरावती.